वर्ष : ०६ | अंक: १० | मुंबई, मंगळवार २८ जानेवारी २०२० ते सोमवार ३ फेब्रुवारी २०२० | पृष्ठ: ४

मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

PG 2 'बेस्ट'चीही अहोरात्र धाव

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

3 → संकोचलेली लोकशाही !

मीरा भाईंदर न्यायालयाचे काम निधीअभावी रखडले ← 4

### रिझर्व्ह बँकेने समोर आणली धक्कादायक माहिती

# नागरी सहकारी बँकांमध्ये २२० कोटी रुपयाचे घोटाळे

पंजाब अँड महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेतील घोटाळ्यांनी ठेवीदार, खातेदार धास्तावलेले असताना देशातील नागरी सहकारी बँकांची आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. देशभरातील नागरी सहकारी बँकांमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये २२० कोटी रूपयांचे घोटाळे झाले आहेत.



### कोणत्या वर्षी किती झाले घोटाळे आणि त्या घोटाळ्यातील एकूण रक्कम किती होती?

| वर्ष | घोटाळे | रक्कम |
|---|---|---|
| २०१८-१९ | १८१ | १२७.७ कोटी |
| २०१७-१८ | ९९ | ४६.९ कोटी |
| २०१६-१७ | २७ | ९.३ कोटी |
| २०१५-१६ | १८७ | १७.३ कोटी |
| २०१४-१५ | ४७८ | १९.८ कोटी रुपये |

आणखी धक्का देणारी माहिती अशी की २०१८ -२०१९ या एका वर्षात १८१ घोटाळे झाले आणि ते होते तब्बल १२७.७ कोटी रुपयांचे.

माहिती अधिकाराखाली पीटीआय या वृत्तसंस्थेने विचारलेल्या माहितीमध्ये रिझर्व्ह बँकेनेच हा खुलासा केला आहे. रिझर्व्ह बँकेच्या माहितीनुसार, देशभरात तब्बल एक हजारांवर घोटाळे झाले आहेत. २०१७-१८ या वर्षात ९९ प्रकरणांमध्ये ४६.९ कोटींचे घोटाळे झाले आहेत तर २०१६-१७ साली २७ प्रकरणांमध्ये ९.३ कोटी रूपयांचे घोटाळे झाले आहेत.

२०१५-१६ या वर्षात १८७ प्रकरणांमध्ये १७.३ कोटी रूपयांचा घोटाळा झाला आहे. तर २०१४-१५ या साली तब्बल ४७८ घोटाळे झाले आहेत. त्यात १९.८ कोटी रुपयांची अफरातफर करण्यात आली आहे.

२०१४-१५ ते २०१८-१९ या पाच वर्षांच्या काळात तब्बल ९७२ घोटाळे झाल्याचा धक्कादायक खुलासा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने केल्याचे वृत्त पीटीआय या वृत्तसंस्थेने दिले आहे. या घोटाळ्यांमध्ये २२१ कोटी रुपयांची अफरातफर झाली आहे. या घोटाळ्यांबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया म्हणते की, 'ज्या बँकांमध्ये हे घोटाळे झाले आहेत त्यांनी तपास संस्थांकडे फौजदारी गुन्हे दाखल करायला हवे. तसेच घोटाळ्यांमध्ये सहभागी असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अंतर्गत प्रक्रियद्वारे कारवाई करावी. शिवाय कर्मचाऱ्यांच्या जबाबदारीबद्दल लक्ष घालायला हवे.'

#### किती जणांवर झाली कारवाई? माहीत नाही!!

घोटाळे करणाऱ्या किती जणांवर आतापर्यंत कारवाई करण्यात आली, असं विचारलं असता रिझर्व्ह बँकेने 'माहिती उपलब्ध नाही' असं उत्तर दिलं आहे.




### केजरीवालांचं मतदारांना अजब आवाहन

# इतक्या वेळा बटण दाबा की, बटणच खराब झालं पाहिजे



दिल्लीतील राजकीय वातावरण दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारानं तापू लागलं आहे. आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या असून, विरोधकांना उत्तर देताना नेत्यांचं भान सुटत असल्याचं समोर येऊ लागलं आहे. दिल्लीला शाहीन बागेतून सोडवायचं असेल, तर कमळाचं बटण दाबा, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं होतं. त्याला उत्तर देताना दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अजबच आवाहन मतदारांना केलं आहे. 'सर्व मतदानांसाठी जावं आणि इतक्या वेळा झाडूचं बटण दाबावं की, बटण खराब झालं पाहिजे,' असं केजरीवाल म्हणाले.

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची दिल्लीत सभा झाली. यावेळी बोलताना केजरीवाल म्हणाले, 'पुन्हा एकदा राजकारण बदलण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे आठ फेब्रुवारीला सर्व लोकांनी जावे आणि झाडूचं बटण दाबावं. इतकं बटण दाबा, इतकं बटण दाबा की, बटणच खराब झालं पाहिजे,' असं केजरीवाल म्हणाले.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना उत्तर देताना केजरीवाल म्हणाले,'अमित शाह त्यांच्या भाषणात म्हणाले की, कुठेही सीसीटीव्ही दिसले नाही. त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्याच्या सभेचं सीसीटीव्ही फुटेज पाठवण्यात आलं. आमच्या सरकारनं दोन लाख सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत.

# राज ठाकरेंची एनआरसी मोर्चाची जोरदार तयारी



**मुंबई** : राष्ट्रीय नागरिक नोंदणी अर्थात एनआरसीच्या समर्थनार्थ मनसेचा ९ फेब्रुवारी रोजी मुंबईत मोर्चा आहे. या मोर्चाच्या तयारीसाठी राज ठाकरे यांनी आज मनसे पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. मात्र अवघ्या दहा मिनिटांतच राज ठाकरे बैठक आटोपून रंगशारदा सभागृहातून बाहेर पडले. जनजागृतीसाठी मनसे आपला मोर्चा मुस्लीम बहुल भागातून नेण्याची तयारी करत असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान प्रकृती अस्वाथ्यामुळे राज ठाकरे उशिरा सभागृहात पोहोचले आणि पदाधिकाऱ्यांना सूचना करुन निघाले, अशी माहिती समोर येत आहे.

मुंबईतील गोरेगाव इथे २३ जानेवारीला झालेल्या मनसेच्या महाअधिवेशनात राज ठाकरे यांनी राष्ट्रीय नागरिक नोंदणीच्या समर्थनासाठी मनसे ९ फेब्रुवारीला मोर्चा काढणार असल्याचं जाहीर केलं होतं. त्यासाठी राज ठाकरेंनी आज मनसे पदाधिकाऱ्यांची वांद्रेतील रंगशारदा इथे सकाळी दहा वाजता बैठक बोलावली होती. राज ठाकरे साडेबाराच्या सुमारास रंगशारदा सभागृहात पोहोचले आणि त्यानंतर बैठकीत फक्त दहा मिनिटांची उपस्थिती लावून राज ठाकरे बाहेर पडले.

राज ठाकरे यांना थ्रोट इन्फेक्शन झालं आहे. त्यासाठी त्यांची डॉक्टरांची अपॉईंटमेंट होती. त्यामुळे ते बैठकीला उशिरा पोहोचले. या बैठकीत राज ठाकरे यांनी दोन महत्वाच्या सूचना केल्या. एक म्हणजे मला हिंदुहृदयसम्राट म्हणू नका. कारण, तो मान बाळासाहेब ठाकरेंचा त्यांनी सांगितलं. तर, दुसरं म्हणजे पक्षाच्या झेंड्याचा मान राखा, कारण त्यात छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा आहे, अशी माहिती मनसेच्या नेत्यांनी दिली.

# राज्यपालांनी केले राजभवनच्या नव्या रूपातील संकेतस्थळाचे उद्घाटन




### नवे संकेतस्थळ दिव्यांगजन-स्नेही

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज राजभवनाच्या नव्या संकेतस्थळाचे कळ दाबून उद्घाटन केले. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राष्ट्रीय माहितीविज्ञान केंद्राने विकसित केलेले हे संकेतस्थळ सुरक्षित, सुगम्य, सुलभ व दिव्यांग-जन स्नेही असल्याबद्दल राज्यपालांनी समाधान व्यक्त केले. जनतेला राजभवन भेटीसाठी पूर्वीप्रमाणेच या संकेतस्थळावर नोंदणी आरक्षण करता येईल.राजभवन संकेतस्थळः rajbhavan-maharashtra.gov.in

# ठाणे जिल्ह्यात शिवभोजन योजनेचा शुभारंभ



### गरजू व्यक्ती पर्यंत शिवभोजन पोहचविणार -पालकमंत्री शिंदे

**ठाणे** - जिल्ह्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात शिवभोजन उपलब्ध करून देणार असल्याचे प्रतिपादन नगरविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

संतोषी माता महिला बचतगट यशोधननगर

उर्वरित पृष्ठ 4 वर

# मध्यरात्री दीडनंतर मद्यविक्री केल्यास २ वर्षांपर्यंत परवाना रद्द

**'मुंबई चोवीस तास'चा प्रयोग २६ जानेवारीपासून सुरू होणार असून मद्यविक्रीवरील बंधने मात्र कायम आहेत. रात्री दीडनंतर मद्यविक्री केल्यास बारचा परवाना दोन वर्षांसाठी रद्द करण्यात येणार आहे. तर मॉलसाठी चोवीस तास खुले राहण्याची परवानगी काढून टाकली जाणार आहे. मुंबई चोवीस तासांसाठी पालिकेने नियमावली तयार केली असून त्यात हे स्पष्ट करण्यात आले आहे.**



मुंबई चोवीस तास या संकल्पनेवरून अद्याप सर्व यंत्रणांमध्ये, ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. या संकल्पनेबाबत सुस्पष्टता यावी याकरिता पालिकेने नियमावली तयार करून जाहीर केली आहे. पालिकेतील साहाय्यक आयुक्त आणि मुंबई चोवीस तास संकल्पनेचे नोडल ऑफिसर शरद उघडे यांनी ही नियमावली तयार केली आहे.

पोलीस विभाग, पालिका, राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या जबाबदाऱ्या, तसेच मॉल व मिल आणि थिएटर मालक यांच्या जबाबदाऱ्या काय असतील याबाबत ही नियमावली आहे.

मुंबई चोवीस तास संकल्पनेमुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील व पर्यटन वाढीस चालना मिळेल हा मुख्य हेतू आहे.

मद्यविक्रीवरील सध्या असलेली बंधने मात्र कायम राहणार असून मद्य मागवण्याची परवानगी मध्यरात्री १ वाजण्यापूर्वी द्यावी असेही स्पष्ट करण्यात आलेले आहे. आम्ही दीडनंतर मद्य विकत नाही, असे शपथपत्र बार मालकांना राज्य उत्पादन शुल्क विभागाला द्यावे लागणार आहे, तशी जाहीर नोटीस बारच्या दर्शनी भागातही लावावी लागणार आहे.

#### नियमावलीतील काही ठळक वैशिष्ट्ये

- मुंबई चोवीस तास संकल्पनेत सुरुवातीला मॉल, मिल कंपाउंड अशा स्वतंत्र प्रवेशद्वार असलेल्या अस्थापनांतील दुकाने व उपाहारगृह २४ तास खुली ठेवता येणार आहेत.
- दुकानदारांच्या इच्छेनुसार दररोज चोवीस तासांऐवजी रात्री उशिरापर्यंत किंवा फक्त शनिवार, रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी, सणाच्या दिवशी चोवीस तास दुकान सुरू ठेवता येईल.
- मॉल मालकांना जाहिरात करून सगळ्यांना समान बोधचिन्ह वापरून ग्राहकांना आकर्षित करता येणार आहे.
- मॉलमध्ये लाइव्ह संगीत कार्यक्रम करता येतील, मात्र त्याकरता तिकीट विक्री करता येणार नाही.
- लोकांनी या संकल्पनेचा लाभ घ्यावा म्हणून खरेदीवर सूट देता येईल.
- रात्रपाळीत काम करणाऱ्या कामगारांना अधिक मोबदला देता येईल.
- उपाहारगृहांना खाद्य महोत्सव भरवता येतील.

# 'इंटरनेट हँडलिंग चार्जेस'च्या नावाखाली चित्रपटाच्या ऑनलाइन तिकीट बुकिंगमधून लूट

**इंटरनेट हँडलिंग चार्जेसच्या नावाखाली उकळला जाणारा पैसा हा ऑनलाइन तिकीट ॲप कंपन्यांना जमा होत आहे. कोणत्याही बँकेच्या क्रेडिट व डेबिट कार्डवरून हे शुल्क वजा होत आहे. वास्तविक हे वजा झालेले शुल्क चित्रपटगृहांनी देणे अपेक्षित आहे. मात्र यावर बँकांचाही वचक नाही. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष विजय सगर म्हणाले, ''इंटरनेट हँडलिंग चार्जेसच्या नावाखाली पैसे उकळण्याचे प्रकार सुरू आहेत. वास्तविक हे शुल्क चित्रपटगृहांनी भरणे आवश्यक आहे. याविषयी अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. मात्र आता सरकारला या कंपन्याविरोधात लेखी पत्र देणार आहोत. यातही पारदर्शकता असणे आवश्यक आहे. कंपन्यांची ही मोनोपॉली आहे. डिजिटलच्या नावाखाली नागरिकांची लूट सुरू आहे.'**

वेळेची बचत आणि रांगेत उभे राहण्यापेक्षा विविध ॲपच्या माध्यमातून चित्रपटप्रेमी ऑनलाइन तिकीट बुक करतात. मात्र त्यांना तिकीट दराच्या व्यतिरिक्त 'इंटरनेट हँडलिंग चार्जेस'च्या नावाखाली दहा टक्के भुर्दंड सहन करावा लागतो. या अतिरिक्त शुल्कासाठी कोणतीही अधिकृत नियमावली नसताना नागरिकांची दिशाभूल करून खासगी कंपन्यांकडून आर्थिक लूट केली जात आहे.



सध्याच्या धकाधकीच्या जीवनात युवा वर्गाकडून चित्रपटाचे ऑनलाइन तिकीट बुक करण्याकडे कल वाढत आहे. यातून बुकिंग करणाऱ्या कंपन्यांना लाखो रुपयांची कमाई होत आहे. सजग नागरिक मात्र चित्रपटगृहात याविषयी आवाज उठविण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र नेमकी दाद कोणाकडे मागायची, असा प्रश्न नागरिकांसमोर आहे. इंटरनेट हँडलिंग चार्जेसची कोणतीही अधिकृत शासकीय नियमावली नाही. प्रत्येक तिकीट बुकिंगच्या मागे ऑनलाइन दहा टक्के रक्कम खासगी कंपन्यांकडून आकारली जात आहे. याशिवाय प्रत्येक चित्रपटगृहात तिकिटाचे दरही वेगवेगळे आहेत. त्यामुळे इंटरनेट हँडलिंग चार्जेसही वेगवेगळे आकारले जात आहेत. यासाठी ठराविक शुल्क नाही.

ऑनलाइन बुकिंग इंटरनेट जादा शुल्क आकारण्याविरोधात ग्राहकांनी समोर येऊन आवाज उठविणे अपेक्षित आहे. ऑनलाइन कंपन्या या माध्यमातून बक्कळ पैसा कमवत आहेत. रसिकांना जादा पैशाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. ग्राहकांना सुविधा हव्या आहेत; मात्र या सुविधांचा गैरवापर नको. एकीकडे डिजिटल इंडियाकडे वाटचाल हवी, असा नारा दिला जातो. दुसरीकडे लूट सुरू आहे. चित्रपटगृहांकडे याकरिता स्वत:ची सक्षम यंत्रणा हवी. सध्या या ऑनलाइन बुकिंगवर कोणाचेही नियंत्रण नाही.

# 'बेस्ट'चीही अहोरात्र धाव



प्रशासन सज्ज; रविवार मध्यरात्रीपासून 'मुंबई २४ तास'

**प्रजासत्ताक दिनाच्या मध्यरात्रीपासून म्हणजेच आज मध्यरात्रीपासून 'मुंबई २४ तास' होणार असून, या संकल्पनेला साकारण्यासाठी बेस्ट उपक्रमाचाही हातभार लागणार आहे. बेस्ट प्रशासनाकडून चोवीस तास सुरू राहणाऱ्या मुंबईचा आढावा घेण्यात येणार असून आठवडय़ाभरात दिवसभर सेवा देण्याची तयारी दर्शविण्यात आली आहे.**

यासाठी मध्यरात्रीच्या वेळेत बेस्टने वातानुकूलित मिनी बसगाडय़ा चालवण्याची तयारी सुरू केली आहे. चार दिवस मुंबईचा आढावा घेतल्यानंतर त्याचा अहवाल तयार करूनच पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

सध्या बेस्टच्या सर्वसामान्य बसचे पाच किलोमीटरसाठी पाच रुपये आणि वातानुकूलित गाडीचे सहा रुपये भाडेदर निश्चित करण्यात आले आहेत. प्रवासभाडे कपात करण्यापूर्वी बेस्टचे प्रतिदिन सरासरी १९ लाख प्रवासी होते. त्यात वाढ होऊन ३४ लाखांपर्यंत प्रवासी संख्या पोहोचली. मात्र उत्पन्न काहीसे घटले. जास्तीत जास्त प्रवासी व उत्पन्न मिळवण्यावर सध्या बेस्ट उपक्रमाकडून भर दिला जात आहे.


मध्य रेल्वेवरील 'सीएसएमटी' येथून मुख्य मार्गावर शेवटची लोकल मध्यरात्री १२.३० वाजता सुटते, तर हार्बरवरील मध्यरात्री १२.४० आणि पश्चिम रेल्वेवर चर्चगेट येथून मध्यरात्री १ वाजता लोकल सुटते. अन्य स्थानकांतूनही मुंबईच्या दिशेने येणाऱ्या शेवटच्या लोकल या वेळेत बंद होतात. त्यानंतर लोकल नसल्याने त्याचा लाभ बेस्ट घेणार आहे. सध्या मुंबईत साधारण पहाटे ६ वाजता पहिली बस सेवा सुरू होते. त्यामुळे 'मुंबई २४ तास' संकल्पनेत पहाटे चापर्यंत ठेवण्यात येणाऱ्या सेवेला मिळणाऱ्या प्रतिसादानंतरच बस सेवा टप्प्याटप्प्यापर्यंत सहापर्यंत जोडण्याचा प्रयत्न असेल.

### होणार काय?

'मुंबई २४ तास' संकल्पनेचा बेस्ट उपक्रमाला काही प्रमाणात फायदा होऊन प्रवासी व उत्पन्नात वाढ होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळेच बेस्टने २४ तास सेवा देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. सध्या बेस्टच्या मध्यरात्री साडे बारा वाजेपर्यंत असणाऱ्या बस सेवा प्रथम मध्यरात्री २ पर्यंत चालवण्याचा विचार असेल. त्यानंतर मिळणारा प्रतिसाद पाहून त्या पहाटे चापर्यंत धावतील.

'मुंबई २४ तास' संकल्पनेतील मॉल्स, हॉटेल्स, मार्केट इत्यादी गर्दीच्या ठिकाणांचा चार दिवसांत आढावा घेतला जाईल. त्याला मिळणारा प्रतिसाद पाहिला जाईल. लोकांकडून नेमक्या कोणत्या वाहतूक सेवांना प्राधान्य दिले जात आहे.

# पोलिसांचे विशेष घोडदळ सेवेत



**मुंबई** - कायदा आणि सुव्यवस्था सांभाळण्यासाठी घोड्यांवर स्वार असलेले पोलिस हे चित्र आता मुंबईतही दिसणार आहे. प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने आज मुंबई पोलिस दलात अश्वदल दाखल होणार आहे. या पथकात नियुक्त झालेल्या अधिकारी-जवानांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. या पथकाकडून दैनंदिन स्तरावर नेमकी कशी जबाबदारी सांभाळली जाणार, याकडे मुंबई पोलिस दल आणि मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

देश-विदेशात पोलिसांकडून अश्वदलाचा वापर केला जात असून मुंबई त्यात अपवाद होते. ब्रिटिश जमान्यात मुंबईत ८८ वर्षांपूर्वी पोलिसांचे घोडदळ कार्यरत होते. तेव्हा वाहनांची संख्या वाढल्याने पोलिसांचे अश्वदल सेवेतून बाद करण्यात आले. त्यानंतर आता प्रथमच नव्याने पोलिसांनी अश्वदलाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. गुजरात, कोलकाता, केरळ, कर्नाटक, हैदराबाद, चेन्नई पोलिसांपाठोपाठ मुंबईतही आता 'माऊंटेड पोलिस युनिट' दाखल झाले आहे. प्रजासत्ताक दिनी शिवाजी पार्क येथील संचालनात पथकाचा समावेश आहे. मुंबईतील गर्दीच्या ठिकाणी नियंत्रणासाठी पोलिसांच्या अश्वदलाचा आधार लाभणार आहे. या पथकात प्रशिक्षित घोडे, पोलिस उपनिरीक्षक, ३० पोलिसांचा त्यात सहभाग आहे. या चमूस पुणे, कल्याणमध्ये लष्करातील सेवानिवृत्त सुभेदार आर. टी. निर्मल यांच्याकडून प्रशिक्षण देण्यात आले. घोडेस्वारीबरोबरीनेच घोड्यांचा आहार, आरोग्याची काळजी, घोड्यांची देखभाल या गोष्टींचा प्रशिक्षणात समावेश होता.

# १० रुपयांच्या थाळीला 'आधार'सक्ती..

**मुंबई - १० रुपयात सकस आहार. विधानसभा निवडणुकांपूर्वीच शिवसेनेने या थाळीची घोषणा केली. यानंतर यावरून मोठ्या प्रमाणात राजकारण देखील झालेलं पाहायला मिळालं. अनेक ठिकाणी शिवसैनिकांनी स्वतःहून १० रुपयात थाळी योजना सुरु केली. अगदी जम्मू काश्मीरमध्ये देखील शिवसेनेकडून दहा रुपयात थाळीची योजना सुरु झालेली पाहायला मिळाली. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात देखील याबद्दल चर्चा झाली आणि प्रायोगिक तत्त्वावर १० रुपयात थाळीची योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला गेला.**



दहा रुपयांच्या थाळीची किंमत जवळपास ५० रुपये आहे. यातील दहा रुपये हे ग्राहकाकडून आणि उर्वरित ४० रुपयांचे अनुदान स्वरूपात राज्य सरकारकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे अशी माहिती आहे. याच सबसिडीच्या मुद्द्यवरून विरोधकांनी मोठा आक्षेप घेतलेला पाहायला मिळाला. अशातच आता पुन्हा एकदा या थाळीवरून मोठा वादंग निर्माण होणार आहे असं चित्र आहे.

या दहा रुपयांच्या थाळीत ३० ग्रॅमच्या दोन पोळ्या, १०० ग्रॅम भाजीची वाटी, १५० ग्रॅम मूद असलेला भात आणि १०० ग्रॅम वरण यांचा समावेश असणार आहे. राज्यातील गरीब आणि गरजू जनतेला केवळ १० रुपयात शिवभोजन थाळी उपलब्ध करुन देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ही योजना प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यासाठी तीन महिन्यात ६ कोटी ४८ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

काय आहे नवीन नियम ?

महाराष्ट्र सरकारतर्फे रुपयात थाळीचा प्रयोग प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यात आला आहे. या अंतर्गत तब्ब्ल १५ ठिकाणी ही योजना सुरु करण्यात आली आहे. मात्र आता या थाळीसाठी आता आधार कार्डाची गरज भासणार आहे. याचसोबत तुम्हाला तुमचा फोटो देखील देणं बंधनकारक राहणार आहे. ही थाळी घेण्यासाठी एकप्रकारची फोटो आयडेंटिफिकेशन सिस्टीम लागू करण्यात येणार आहे अशी माहिती आता समोर येताना पाहायला मिळतेय.

दरम्यान, ही थाळी जर गरिबांसाठी आहे तर अशा प्रकारच्या अटी आणि शर्थी कशासाठी? असा सवाल आता विचारण्यात येतोय. सुरवातीला ३ महिने ही थाळी दहा रुपयात देण्यात येणार आहे. त्यानंतर याबाबत अधिक माहिती घेऊन पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

# राज्यातील ५४ अधिकाऱ्यांना पोलीस पदके

आपल्या सेवाकाळात पराक्रम गाजविणाऱ्या, उल्लेखनीय आणि गुणवत्तापूर्ण कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त केंद्र शासनाने शनिवारी पोलीस पदके जाहीर केली. यात राज्यातील ५४ जणांचा समावेश असून, भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) अधिकारी अर्चना त्यागी, संजय सक्सेना, शशांक सांडभोर, वसंत साबळे यांना राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे.

मुंबईत सहपोलीस आयुक्त (प्रशासन) पदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अर्चना त्यागी सध्या राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) अतिरिक्त पोलीस महासंचालक आहेत. राज्य पोलीस दलाचे अतिरिक्त महासंचालक (प्रशिक्षण आणि विशेष शाखा) संजय सक्सेना यांनी मुंबईच्या गुन्हे शाखेचे सहआयुक्त पदी उल्लेखनीय कामगिरी बजावली होती. सहायक पोलीस आयुक्त सांडभोर यांनी अनेक वर्षे गुन्हे शाखेच्या गुन्हे गुप्तवार्ता (सीआययु) या अत्यंत महत्त्वाच्या विभागात कार्य केले



आहे. तर वसंत साबळे सातारा जिल्ह्य़ातील कोरेगाव तालुक्यात सहायक पोलीस निरीक्षक पदी कार्यरत आहेत.

याशिवाय वाहतूक विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त अतुल पाटील, पोलीस अधीक्षक (इंटरपोल) धनंजय कुलकर्णी, पोलीस उपायुक्त नंदकुमार ठाकूर, सहायक पोलीस आयुक्त नंदकिशोर मोरे, स्टीवन अँथनी, वरिष्ठ

पोलीस निरीक्षक मुकुंद पवार यांच्यासह ४० अधिकाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवा बाजावल्याबद्दल पदक जाहीर झाले आहे.

'पद्मश्री'मुळे माझ्या लढय़ाची दखल घेतली गेली याचे समाधान वाटते. मात्र, ज्या दिवशी महिलांकडे माणूस म्हणून पाहिले जाईल, त्या दिवशी या पुरस्काराचा खरा आनंद वाटेल. केवळ मुस्लीम महिलाच नव्हे तर सर्वच सामाजिक स्तरांतील महिलांवर अन्याय होत आहेत, त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी, त्यांना सन्मान बहाल करण्यासाठी धर्मापलिकडे जाऊन कायदे होण्याची गरज आहे. त्या दृष्टीने सरकारने काम केले तर तो खरा पुरस्कार ठरेल.

# मुख्यमंत्री ७ मार्चला जाणार अयोध्येला

**मुंबई - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे येत्या ७ मार्च रोजी अयोध्येच्या दौऱ्यावर जाणार असून, त्यांच्यासोबत शिवसेनेचे मंत्री आणि खासदारसुद्धा असतील, अशी माहिती शिवसेना नेते खा. संजय राऊत यांनी शनिवारी मुंबईत दिली. अयोध्येत प्रभु श्रीरामचंद्राचे दर्शन घेतल्यानंतर मुख्यमंत्री ठाकरे हे शरयू नदीच्या तीरावर आरतीसुद्धा करणार आहेत, असे राऊत यांनी ट्वीट करून स्पष्ट केले आहे.**



यापूर्वीसुद्धा शिवसेना पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अयोध्येचा दौरा केला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचा रामजन्मभूमी प्रकरणी निवाडा आला. राज्यातील महाविकास आघाडी सरकारच्या १०० दिवसांच्या पूर्तीनिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे अयोध्येचा दौरा करणार असल्याचे याआधी जाहीर करण्यात आले होते. आता त्या दौऱ्यासाठी ७ मार्च ही तारीख निश्चित झाली आहे. या अयोध्या दौऱ्याच्या वेळी देशभरातून हजारो शिवसैनिक येणार आहेत, असेही राऊत म्हणाले.

अयोध्येला जाताना काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना सोबत घेऊन उद्धव ठाकरे यांनी जावे अशा आशयाची टीका भाजपने केली होती. त्याला उत्तर देताना संजय राऊत म्हणाले की, रामजन्मभूमीचा निकाल सर्वोच्च न्यायालयानेच दिला आहे. त्या निकालाचे सोनिया गांधी, राहुल गांधी आणि शरद पवार यांनी स्वागतच केले आहे. महाविकास आघाडी सरकारमधील आमच्या मित्रपक्षाच्या नेत्यांनादेखील अयोध्येला सोबत येण्याचे आवाहन आम्ही करणार आहोत. अयोध्या यात्रा हा काही राजकीय प्रश्न नाही. जशी पंढरपूरची वारी असते तशीच ही वारी आहे, असे राऊत म्हणाले.

राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हिंदुत्ववादी भूमिकेबद्दल विचारता संजय राऊत यांनी स्पष्ट उत्तर देण्याचे टाळले. शिवसेना आपल्या विचारांवर ठाम आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी देशात प्रखर राष्ट्रवादाचा विचार रूजविला आहे. आता काही लोकांना नवीन पालवी फुटत असेल तर फुटू दे. बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना याचे लोकांना रोज स्मरण होते. हिंदुत्वाच्या विषयावर शिवसेनेला कोणी आव्हान देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असेही संजय राऊत म्हणाले.

# सुधारित नागरिकत्व कायद्याचा मुस्लीम धर्मीयांना जाच नाही!




**मुंबई :** केंद्र सरकारच्या सुधारित नागरिकत्व कायद्याचा, तसेच राष्ट्रीय नागरिक नोंदणीचा देशातील मुस्लीम समाजाला जाच होणार नाही, असे सरकारने म्हटले आहे. मात्र केवळ मुस्लीमच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीला नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी काहीना काही पुरावे सादर करावे लागणार आहेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. सुधारित नागिरकत्व कायदा व नागरिक नोंदणीच्या संदर्भातील सध्या केल्या जाणाऱ्या आरोपांचे केंद्र सरकारने राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या माध्यमातून खंडन केले आहे.

केंद्र सरकारच्या सुधारित नागिरकत्व कायदा (सीएए) व नागरिक नोंदणीवरून (एनआरसी) सध्या देशभर वाद पेटला आहे. त्याविरोधातील आंदोलनाने सारा देश ढवळून निघाला आहे. सुधारित नागरिकत्व कायदा व नागरिक नोंदणी ही धर्माच्या आधारावर केली जात आहे आणि त्यामुळे त्याचा सर्वाधिक त्रास किंवा जाच लागणार आहे, असा या कायद्याला विरोध असणाऱ्या राजकीय पक्षांचा व सामाजिक संघटनांचा आरोप आहे.

सुधारित नागरिकत्व कायदा व नागरिक नोंदणी उपक्रम मुस्लीम धर्मीयांच्या विरोधात कसा नाही, याचा प्रचार करण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचा वापर केला आहे. आयोगाच्या संकेतस्थळावरून प्रश्नोत्तराच्या स्वरूपात सुधारित नागरिकत्व कायदा व राष्ट्रीय नागरिक नोंदणीविरोधातील आरोपांचे खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे.

# मुंबईत करोना विषाणूचा तिसरा संशयित रुग्ण

मुंबई : करोना विषाणू संसर्गाच्या दोन संशयितानंतर अजून एक संशयित रुग्ण मुंबईत आढळला असून या तिघांनाही उपचारासाठी चिंचपोकळी येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मुंबई विमानतळावर शुक्रवापर्यंत १ हजार ७८९ रुग्णांची तपासणी केली असून यात राज्यातील सात जणांचा समावेश आहे. तर मुंबईतील रुग्णांसह देशभरात एकूण ११ जण संशयित असून त्यातील काही केरळमध्ये तर काही हैदराबादमध्ये आढळले आहेत.

चीनच्या वुहान शहरात ३१ डिसेंबर २०१९ रोजी करोना विषाणुंचा उद्रेक झाल्याचे जाहीर करण्यात आले. या पार्श्वभूमीवर देशात मुंबईसह सात आंतरराष्ट्रीय विमानतळावर तपासणी सुरू केली आहे. यात मुंबईतील वसई आणि नालासोपारा येथे स्थायिक असलेल्या आणि चीनमधून परतलेल्या दोन जणांना सौम्य



सर्दी, ताप अशी लक्षणे असल्याचे तपासणीत आढळले. प्रतिबंधात्मक म्हणून गुरुवारी त्यांना कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले. शुक्रवारी मुंबईतील अजून एक संशयित रुग्ण विमानतळावरील तपासणीत आढळलेला आहे. त्यालाही शुक्रवारी सायंकाळी कस्तुरबा रुग्णालयामध्ये दाखल केले आहे. चीनसह जपान, थायलंड, दक्षिण कोरिया आणि अमेरिकेतही या विषाणूची बाधा झालेले रुग्ण नोंदले आहेत. त्यामुळे या देशांतून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी मुंबई विमानतळावर केली जात असून शुक्रवारपर्यंत १ हजार ७८९ रुग्णांची तपासणी केली गेली. यात मुंबईतील चार आणि पुण्यातील तीन जणांचा समावेश आहे. मुंबईतील तिघांना संशयित लक्षणे असल्याने कस्तुरबामध्ये दाखल केले असून उर्वरित प्रवाशांना लागण झाली आहे का यावरही देखरेख ठेवली जाईल, असे राज्य साथरोग विभागाने स्पष्ट केले आहे. संशयित रुग्णांच्या रक्ताचे नमुने चाचणीसाठी पुणे येथील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे (एनआयव्ही) पाठविले आहेत. याचा अहवाल शुक्रवापर्यंत येणे अपेक्षित आहे. बाधित देशातून आलेल्या प्रवाशांची २८ दिवसांपर्यंत दैनंदिन नोंद ठेवली जाणार आहे. संशयित रुग्णांच्या उपचारासाठी मुंबईत कस्तुरबा व पुण्यात नायडू रुग्णालयात सुविधा करण्यात आली आहे.

# वांद्रे-वरळी सी लिंकवर फास्टॅग प्रणाली कार्यान्वित

राजीव गांधी सागरी सेतू (वांद्रे – वरळी सागरी सेतू) पथकर नाक्यावर शुक्रवारी फास्टॅग प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. फास्टॅग प्रणालीने परिपूर्ण असलेला हा मुंबईतील पहिला पथकर नाका ठरला आहे.

राज्यभरातील फास्टॅग प्रणालीसाठी पथकर नाक्यांवर पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची नोडल एजन्सी म्हणून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने नियुक्ती



केली आहे. त्याअंतर्गत मुंबईतील राजीव गांधी सागरी सेतूवर शुक्रवारी फास्टॅग प्रणालीचा प्रारंभ करण्यात आला. सागरी सेतूच्या पथकर नाक्यावर एकूण १६ मार्गिका आहेत. पहिल्या टप्प्यात पथकर नाक्यावरील सहा मार्गिका ह्या फास्टॅग वाहनधारकांसाठी राखीव असतील. पुढील काही दिवसांमध्ये आणखी सहा मार्गिका फास्टॅगमध्ये रुपांतरीत करण्यात येतील. उर्वरित चार मार्गिका ह्या रोख भरणा म्हणून राहतील. 'सागरी सेतूवरील पथकर नाक्यावरील फास्टॅग प्रणालीमुळे मुंबईकरांचा प्रवास वेगवान होईल. नाक्यावर रांगेत थांबण्याची गरज भासणार नाही. मुंबईतील इतर पथकर नाक्यावर ही प्रणाली कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे', असे सहव्यवस्थापकीय संचालक विजय वाघमारे यांनी सांगितले.

# बीकेसीतील हवा दिल्लीपेक्षा घातक



**मुंबई :** महाराष्ट्रातील पहिला नियोजित 'बिझनेस डिस्ट्रिक्ट' अशी ओळख असलेल्या वांद्रे-कुर्ला संकुलात हवेतील प्रदूषणाची पातळी शनिवारी दिल्लीपेक्षा घातक होती, तर नवी मुंबईतील हवा दिल्लीएवढीच प्रदूषित होती. या दोन्ही ठिकाणी हवा श्वास घेण्यासाठी धोकादायक असल्याची नोंद भारतीय उष्णकटिबंधीय संस्थेच्या 'सफर' उपक्रमांतर्गत करण्यात आली. वांद्रे-कुर्ला संकुलातील (बीकेसी) वायुप्रदूषणाची पातळी घटण्याचा अंदाज असला, तरी ती अतिदूषितच राहील. नवी मुंबई आणि चेंबूर येथील प्रदूषणाची पातळी वाढणार असल्याने नागरिकांनी सकाळी धावण्याऐवजी चालण्याचा व्यायाम करावा, असा सल्ला देण्यात आला आहे. मुंबईतील कुलाबा आणि भांडुप या दोन ठिकाणची हवा श्वास घेण्यासारखी होती, तर अंधेरी, चेंबूर, वरळी, माझगाव या ठिकाणची हवा प्रदूषित आणि मालाडची हवा अतिदूषित होती.

वांद्रे-कुर्ला संकुलातील प्रत्येक घनमीटर हवेत तरंगत्या धूलिकणांचे (पीएम २.५) प्रमाण ३४८ मायक्रोग्रॅम होते. त्याखालोखाल मालाडमध्ये हे प्रमाण ३०३ मायक्रोग्रॅम होते. हे प्रमाण नवी मुंबईतील हवेत ३३० मायक्रोग्रॅम, तर दिल्लीतील हवेत ३३० मायक्रोग्रॅम होते.

## संपादकीय...



# संकोचलेली लोकशाही !



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताचा सातत्याने गौरव केला जातो. मात्र त्याच भारतात लोकशाही मूल्ये पायदळी तुडवली जात असल्याची तसेच नागरी स्वातंत्र्याचा संकोच होत असल्याची तक्रार गेल्या काही वर्षांत सातत्याने होत आहे. परंतु 'सेक्युलर' लोकांचा केंद्र सरकारविरोधातील अपप्रचार, अशी संभावना करून त्याला फार किंमत द्यायची नाही अशी वृत्ती सतत वाढताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर समोर आलेली जागतिक लोकशाही निर्देशांकाची (डेमोक्रसी इंडेक्स) आकडेवारी संबंधितांच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे.

या आकडेवारीनुसार जागतिक लोकशाही निर्देशांकामध्ये भारताची मोठी घसरण झाली असून, जागतिक क्रमावारीत भारत ४१व्या स्थानांवरून ५१व्या स्थानी घसरला आहे. 'द इकॉनॉमिस्ट इंटेलिजन्टस यूनिट'ने (ईआययू) २०१९ साठीचा हा अहवाल जारी केला आहे. नागरिकांच्या स्वातंत्र्याच्या संकोचामुळे भारताची ही घसरण झाल्याचा दावा 'ईआययू'ने केला आहे. निवडणूक प्रक्रिया, सरकारचे कामकाज, राजकीय भागीदारी, राजकीय संस्कृती आणि नागरिकांचे स्वातंत्र्य आदी मुद्द्यांच्या आधारे हा निर्देशांक काढला जातो. दरवर्षी १६५ देशांमधील लोकशाहीच्या स्थितीचा अभ्यास करून अहवाल जारी करण्यात येतो. त्यानुसार २०१८मध्ये भारताला ७.२३ टक्के गुण होते, ते घसरून यंदा ६.९० झाले आहेत. पूर्ण लोकशाहीसाठी आठ गुण, त्रुटीपूर्ण लोकशाहीसाठी सहापेक्षा जास्त आणि आठपेक्षा कमी गुण दिले जातात. त्या अर्थाने भारत गेल्या वर्षीही त्रुटीपूर्ण लोकशाही देशांमध्येच होता, यंदा गट कायम राहिला असला तरी दहा क्रमांकांनी घसरण झाली आहे. आर्थिक क्षेत्रातील घसरणीचे आकडे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांकडून वेळोवेळी येत असतात आणि त्या संदर्भात वेगवेगळ्या व्यासपीठांवरून खलही होत असतो. आर्थिक स्थिती संदर्भात अशी चर्चा अत्यावश्यकही असते, परंतु आपल्याकडे त्या तुलनेत एकूणच सामाजिक स्थिती संदर्भात चर्चा अपवादानेच होत असते. लोकशाही मूल्यांचा आदर करणाऱ्या संस्था, व्यक्ती अशा चर्चा घडवून आणत असतात परंतु त्यांचा सूर जेव्हा सरकारच्या विरोधात लागतो तेव्हा त्यांच्यावर हेत्वारोप करून त्यांना मोडीत काढण्याचा प्रयत्न असतो.

सत्ताधारी वर्गाची अन्य घटकांकडे पाहण्याची तुच्छतावृत्ती यातून दिसून येते. विरोधी विचारांच्याप्रती असलेल्या या असहिष्णू वृत्तीचे प्रतिबिंब लोकशाही निर्देशांकात उमटले आहे, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. राजकीय, सामाजिक पातळीवर अनेक आंदोलने उभी राहिली, तळागाळातल्या घटकांनी आपल्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी रस्त्यावर संघर्ष केला. अशा आंदोलनांकडे सरकारने संवेदनशीलतेने पाहण्याची गरज असते, परंतु देशातील विद्यमान राज्यकर्त्यांनी विरोधकांना शत्रू आणि पर्यायाने देशद्रोही गटात टाकून असल्या प्रश्नांपासून नामानिराळे राहण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. मानवी हक्कांची पायमल्ली करणाऱ्या मॉब लिंचिंगसारख्या असंख्य घटना देशभरात घडल्या, त्यासंदर्भातही राज्यकर्त्यांची बेफिकिरी वेळोवेळी दिसून आली. घटनात्मक संस्थांचे खच्चीकरण करण्यामुळेही लोकांचा लोकशाहीवरील विश्वास डळमळीत झाल्याचे चित्र दिसून आले. अर्थात या सगळ्याच गोष्टी लोकशाही निर्देशांकामध्ये मावणाऱ्या नसतील, परंतु अनेक पातळ्यांवर लोकशाहीचा संकोच होताना वारंवार दिसून आले आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी करण्याची तर असंख्य उदाहरणे सांगता येतील. परंतु त्यासंदर्भात उपाययोजना करण्याचे किंवा अशा घटना भविष्यात घडणार नाहीत यासाठी संबधित घटकांना आश्वस्त करण्याऐवजी सत्ताधारी नेते आणीबाणीचे तुणतुणे वाजवत राहिले. लोकशाही निर्देशांकातील निराशाजनक चित्र समोर आल्यानंतरही टेंभा मिरवायचा झाला तर दक्षिण आशियाई देशांमध्ये भारतातील स्थिती सर्वात चांगली असल्याचे सांगता येऊ शकते. कारण दक्षिण आशियाई देशांमध्ये भारत सर्वोच्च ५१ व्या स्थानी असून त्यानंतर श्रीलंका ६९, बांग्लादेश ८०, नेपाळ ९२ आणि पाकिस्तान १०८ व्या स्थानावर आहे. आपला सख्खा शेजारी चीन १६५ देशांच्या यादीत १५३व्या स्थानी आहे. देशातील कोणत्याही घटनेच्या अनुषंगाने पाकिस्तानची चर्चा करणाऱ्या पंतप्रधानांनी, पाकिस्तानच्या तुलनेत आपली लोकशाही सदृढ असल्याचे या अहवालाच्या हवाल्याने सांगितले तरी आश्चर्य वाटायला नको. लोकशाही निर्देशांकामध्ये नॉर्वे, आइसलँड, स्वीडन, न्यूझीलंड, फिनलंड, आयर्लंड, डेन्मार्क, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, स्वीत्झर्लंड ही राष्ट्रे अव्वल आहेत, आपली स्पर्धा त्यांच्याशी असायला हवी. उत्तर कोरिया, सीरिया, सौदी अरेबिया, येमेन या तळातील राष्ट्रांशी नको. लोकशाही सदृढ असणे हेच सदृढ आणि निरोगी राष्ट्राचे लक्षण असते. लोकशाहीचा संकोच झाला की मानवी वृत्तींच्या विकासातही अडथळे येऊन अनेक अनुषंगिक प्रश्न निर्माण होऊन शकतात, जे देशाच्या विकासात अडथळा ठरू शकतात, हे लक्षात घ्यायला हवे.

# लोकशाहीची व्यथा... न्याय देणाऱ्याला शिक्षा... अन लंपटाला संरक्षणाची भिक्षा!

शिक्षक एक गुरुवर्य माणसाच्या आणि लहान मुलांच्या जीवनाला एक आदर्श घडविणारे शिल्पकार म्हणून शिक्षकांचा गौरव होत असतो. आजही असे शिक्षक आहेत. मात्र मजुऱ्या आणि लंपट शिक्षकांच्या घोळक्यात आदर्श शिक्षक दिसेनासे झाले आहेत. शिक्षक आई, बाप, पालक आणि ज्ञानाचे भांडार असतात. शिक्षकांच्या आदर्शावर या देशाची पिढी घडते आहे. मात्र जग बदलत चालले आहे तसे शिक्षक बदलले आणि विद्यार्थीही बदलले आहेत. तरीही शिक्षकाचे महत्व आजही कमी झालेले नाही. पण असे आदर्श ठरणारे शिक्षक हे बोटावर मोजण्या इतकेत आहेत. नाहीतर स्त्रीलंपट शिक्षकांची भरमार आज पाहायला मिळते. मात्र जुन्या शिक्षकांचे आदर्श आणि मान पाहता आजच्या शिक्षकही लायकी नसताना मान द्यावा लागतो आहे. दुसऱ्याची बायको पळवून आणायची, तिला पतीपासून घटस्फोट घ्यायला लावायचा आणि आपण मजा मारायची, पतीने न्यायासाठी एल्गार केला तर त्याचा पुरुषार्थ दाबण्यासाठी त्याला त्याच्याच पूर्वाश्रमीच्या पत्नीद्वारे पोलीस ठाण्यात तक्रार करून तुरुंगात दाबण्याचा प्रयत्न करायचा, यापेक्षाही भयानक ज्या पत्नीने अग्नीस साक्षी ठेवून सात फेरे घेतले. ज्याने समाजात तिला मान सन्मान दिला. त्याच पतीसोबत घटस्फोट होताच त्याचे अस्तित्वच पुसून टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या निर्लज्ज महिला याही स्त्री जातीला कलंक ठरत आहेत. आयुष्याचा सन्मान हरविलेल्या पतीने व्यथा लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभ असलेल्या पत्रकारांकडे मांडली. अन पत्रकाराने निर्भीड पणे लंपट शिक्षकाचे कपडे आचारसंहितेच्या पत्रकारितेच्या चौकटीत फाडले तर त्या पत्रकारही अडकविण्याचा प्रयत्न करून अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि लिखाण स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे काम एका स्त्रीच्या पदरामागे लपलेल्या शिक्षकाने करावे हा त्या स्त्रीचाही आणि पुरुषाच्या पुरुषार्थाचाही अनादर आहे. मात्र तरीही सत्यता समजल्यानंतरही जर कायद्याची दाबून मुटकून अंमलबजावणी होत असेल तर अशा लंपट शिक्षकाला 'सत्य मांडणे हा जर गुन्हा, तर तो करू पुन्हा...पुन्हा' हे दाखवून देणे गरजेचे आहे. दुसऱ्याचे झोपडे उध्वस्त करायचे आणि स्वतःचा रंगमहल सजवायचा असे शिक्षण आणि संस्कृती जर त्या बालमनावर लादली गेली तर निश्चितच येणारी पिढी हि लंपट होईल असेच चित्र दिसत आहे. शिक्षक एक प्रामाणिक आणि स्वकष्टावर कामविलेल्या पैशांवर उदरनिर्वाह करणारा आणि भ्रष्टाचाराची कीड न लागलेला माणूस म्हणजेच शिक्षक पण आज ठाण्यातील एका घटनेवरून मात्र शिक्षकाची परिव्याख्याच बदलली आहे. शिक्षक लंपटगिरी, भोगी, चुना लावणारा असल्याचे समोर आले आहे. विद्येच्या मंदिरात अवगुणांचा महामेरू असल्याचे दिसत आहे.

**आजच्या लोकशाहीत पैसे कि तुती बोलती है अशीच परिस्थिती दिसत आहे. आज जर आगरकर किंवा लोकमान्य टिळक आणि आचार्य अत्रे असते तर अशा लंपट शिक्षकाला शाब्दिक जोडे मारीत त्याची वरात काढली असती, पत्रकारिता आणि शब्दाचे प्रहार ते असतात ज्यात शब्दाच्या एका वाराने लंपटाची कपडे फाटतात. दिसायला ती शाबूत असतात मात्र ज्याच्यावर वार झाला त्याला स्वतःला नागडे झाल्यासारखे वाटते. अशा पत्रकारितेवर अंकुश लावण्याचा प्रयत्न आज खऱ्या अर्थाने करण्यात येत आहे. ठाण्यात 'पैसे कि तुती, अन लंपटांची धोती' उचलून धरणारे वाढल्याने सच्चाई आता टोचू लागली आहे. म्हणून पैशाच्या माजावर आणि दुसऱ्याच्या संसाराच्या होळया करून लोकांना संपविणायचा प्रताप सुरु आहे. अशा लोकांनाचा संपविणायचा घाट घालणे हे नैतिकतेच्या दृष्टीने योग्य ठरेल.**

एका पिडीत पती, उध्वस्त झालेला पती याने जर लोकशाही देशात आपल्या व्यथा जन्मांसासमोर मांडल्या तर त्यात चूक काय? बदनामी कुणाची? अन त्यांनी केलेलं कर्म हे तर अवघ्या स्त्री जातीला कलंकित करीत आहे. त्याचे काय? संस्कृतीची वरात काढीत आहे त्याचे काय? यांच्या दुष्कर्माबद्दल त्यांना शिक्षा करणार कोण? असे अनेक प्रश्न आज एका पत्रकाराला एक बातमी, एक सत्यता प्रसिद्ध केली म्हणून जर इतका त्रास सहन करावा लागत असेल, तर येणाऱ्या काळात पत्रकार बदलले असे म्हणण्यास जागाच राहणार नाही. बदनामी तेव्हाच होते. त्या धर्तीचे कर्म केले तर पण सत्य मांडले म्हणून होणाऱ्या त्रासाच्या विरोधात जर न्याय मागणीसाठी उपोषणाला बसावे लागत असेल तर लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कागदावरच आहे कि अस्तित्वातच नाही असे म्हणावे लागेल. एखाद्याला न्याय देण्यासाठी जर पत्रकार पुढे आला. तर त्या पत्रकाराला न्याय मागणीसाठी उपोषणाला बसावे लागते हेच या लोकशाहीचे दुर्दैव आहे. न्याय कि अन्याय याचा निर्वाळा करण्यासाठी असलेल्या यंत्रणांनी अशा प्रकरणाची सखोल चौकशी करूनच कायदेशीर कारवाई करणे कधीही लोकशाहीत रास्त ठरेल. 'शंभर गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एक निर्दोष फासावर लटकता कामा नये' असे कायदा म्हणतो पण ठाण्यात प्रत्यक्षात काय दिसतंय, काय अनुभवास येतंय? तर शंभर बरबटलेले सुटले तरी चालतील, पण एक न्याय देण्याची भूमिका बजावणारा स्वच्छ पत्रकार सुटता कामा नये असेच चित्र दिसत आहे. म्हतारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावतोय, म्हतार्यावर म्हताऱ्या गिळंकृत करतोय, तेव्हा अशा पिलावळींना वेळीच आवर घाला नाहीतर उद्या मारण्यासाठी म्हतारीच राहणार नाही, अन न्याय देण्यासाठी पत्रकारही पुढे येणार नाही. अशी वेळ येऊ देऊ नका... आणि 'लंपटाच्या माथी हाणू काठी, घ्या फैलावर उचला त्याची ताटी, एवढे असू द्या जनमानसात शौर्य, अपप्रवृतीना नका देऊ धैय.... ज्याचे जळते त्यालाच चटक्याची दाहकता कळते, पण तुम्ही आम्ही सुज्ञ आहोत, काय खरे ? अन काय खोटे ? सगळ्यांनाच कळते... बऱ्याचदा दिसते तसे नसते, म्हणूनच जग फसते. पोलिसांना काय तक्रारदार नीतिमूल्यं हरविलेले असलायनंतर त्यांनाही नौकरी करायची आहे प्रबोधन करता येत नाही. नाही तर उद्या त्यांच्यावर सेटिंग झाल्याचा आरोप होईल. अन तसे पण पोलिसांच्या भूमिका आणि बंघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. आपल्या देशात कोटीच्या घरात न्यायालयात खटले पडून आहेत. न्याय मागणारा न्याय वेळेत मिळत नाही म्हणून हैदराबादमध्ये चक्क पोलिसांनीच कोर्ट चालविले आणि शिक्षाही दिली. वेळेनुसार ते रामबाण इंजेक्शन या समाजातील अपप्रवृतीना ठरेल पण कायद्याने तो वादग्रस्त प्रश्न आहे. कारण या देशात लोकशाही नांदते आहे. पण न्याय देण्र्यासाठी कधी कधी पोलिसांनी चौकटीबाहेर जाऊन न्याय देणे गरजेचे आहे. पोलिसांची कार्यपद्धती बदलली एखाद्या गुन्ह्यात ज्यात केवळ वैमनस्य लपलेले आहे. अशात न्यायालयाने पुरावे तपासण्यापूर्वीच पोलिसांनी पुरावे तपासावे आणि केस दाखल करावी तर बराच कामाचा बोजा हा राज्यात आणि देशात न्यायालयाच्या डोक्यावरील कमी होईल, पण तपासणी निपक्ष होणे गरजेचे आहे. तेव्हा न्याय मागणे आणि देणे हे खरेच सोपे असते पण कायद्याच्या प्रक्रियांमुळे विलंब होतो. तेव्हा न्यायची अपेक्षा सर्वसामान्य माणसाची काहीच नसते पोलिसांनी त्यांची बाजू जरी मांडली तरीही सर्वसामान्य खुश असतात. पण बाजू ऐकण्याची मानसिकता असणे गरजेचे आहे.शेवटी प्रश्न आहे तो नीतिमूल्याचा आणि नैतिकतेचा...... नैतिकतेचा....!

**सत्या - सुरेश साळवे**

# वसईतील क्रीडांगणे बेपत्ता

## खेळांच्या मैदानांसाठी आरक्षित जागांवर अतिक्रमण

**वसई : शहरातील आरक्षित जागांवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी वसई-विरार महापालिकेला अपयश आले आहे. त्यामुळे एकापाठोपाठ एक आरक्षित जागा नष्ट होऊ लागल्या आहेत. खेळांच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या जागादेखील हडप करण्यात आल्याने शहरात मैदानेच उरलेली नाहीत. त्यामुळे गेल्या आठवडय़ात महापालिकेला मैदानी खेळ रस्त्यावर घेण्याची पाळी आल्याची टीका करण्यात येत आहे.**

### 'म्हणूनच क्रीडा स्पर्धा रस्त्यावर'

शहरात खेळांची मैदानेच नसल्याने महापालिकेवर रस्त्यावर खेळ घेण्याची नामुष्की ओढावल्याची टीका होऊ लागली आहे. वसई-विरार महापालिकेने नुकताच वसईत फन स्ट्रीट हा उपक्रम राबवला. विविध खेळांचे रस्त्यावर आयोजन करण्यात आले होते. मात्र या कार्यक्रमावर आगरी सेनेने टीका केली आहे. वसई-विरार शहरातील मैदाने कमी होत असून मैदानासाठी आरक्षित जागेवर अतिक्रमणे होऊ लागली आहेत. त्यामुळे पालिकेला रस्त्यावर खेळांचे आयोजन करण्याची पाळी आली, असा सवाल आगरी सेनेचे प्रवक्ते भूपेश कडुलकर यांनी केला आहे.

वसई-विरार महापालिका क्षेत्रात मोठय़ा प्रमाणावर अतिक्रमणे झालेली आहेत. सरकारी जागा, वनजमिनी भूमाफियांनी गिळंकृत केलेल्या आहेत. परंतु पालिका क्षेत्रातील विविध विकासकामांसाठी नागरी सोयीसुविधांसाठी आरक्षित असलेल्या जागांवरही अतिक्रमणे होत आहेत. वसई -विरार महापालिकेने माहिती अधिकारात दिलेल्या माहितीनुसार वसई विभागामध्ये ५०.६९ टक्के, नालासोपारा विभागामध्ये ७७.३७ टक्के तर विरार विभागामध्ये ३०.४५ टक्के राखीव भूंखडावर अनधिकृत इमारती आणि अतिक्रमण झालेले आहे. सर्वाधिक अतिक्रमणे प्रभाग 'ब' मध्ये ९०.६७ टक्के असून सर्वात कमी २९. ८९ टक्के अतिक्रमणे प्रभाग समिती 'क'मध्ये झालेली आहेत. ही आरक्षित भूंखडे शाळा, खेळण्याची मैदाने, उद्याने, पोलीस ठाणी, कचराभूमी या कामांसाठी आरक्षित करण्यात आली होती. राखीव भूखंडावर मनपाने लक्ष न देता जाणीवपूर्वक कानाडोळा करत अधिकाऱ्यांनी आर्थिक साटेलोटे करत भूमाफियांना मदत करत भूखंड भूमाफियांच्या



घशात घातल्याचा आरोप सामान्य नागरिकांनी केला आहे.

२० ऑगस्ट २०११मध्ये राज्य सरकारने आरक्षित जागांसंदर्भात एक अध्यादेश जाहीर केला होता. त्या अध्यादेशानुसार सार्वजनिक हितासाठी ज्या जागा आरक्षित असतील, त्या जागा विकास करण्यासाठी त्या त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करण्यात येतील, असे या अध्यादेशात म्हटले होते. मात्र त्या जागा पालिकेला हस्तांतरीत केल्या नसल्याने त्यावर अतिक्रमण झाले आहे.

# घोडबंदर किल्ल्याचे सुशोभीकरण अखेर सुरू, आमदारांकडून पाहणी

**ठाणे :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या हद्दीतील ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याच्या सुशोभीकरणाचे काम अखेर सुरु झाले आहे. शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी या किल्ल्यात जाऊन पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांसह किल्ल्यातील कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी आणखी काही कामांची सूचना केली.



किल्ल्याच्या सुशोभीकरणासाठी एक कोटी ८१ लाखांचा खर्च अंदाजित आहे. दुसरीकडे गुरुवारी सरनाईक यांनी पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत या किल्ल्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी बदलही सुचवले आहेत. यामध्ये घोडबंदर किल्ल्याच्या मूळ अस्तित्वाला धोका न पोहोचवता काम होणार आहे. पुरातत्त्व विभागाने केलेल्या सूचनेनुसार काम सुरू आहे. येथील दुरुस्ती झाल्यानंतर किल्ल्याच्या मोकळ्या जागेत विद्यार्थ्यांना बसता येईल, यासाठी जागा तयार करण्यात यावी, घोडबंदर किल्लाच नव्हे तर महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचे महत्त्व येथे येणाऱ्यांना समजावे, किल्ल्यात येणाऱ्यांना एकत्र बसून चर्चा करता यावी, यासाठी बैठकीची जागा, किल्ल्याच्या बुरुजाला लागून नैसर्गिक खडक आहे. त्या मोठ्या खडकावर झाडे उगवली आहेत. किल्ल्याचे सुशोभीकरण होत असताना येथील नैसर्गिक वातावरणात शोभिवंत फुलझाडे या खडकावर लावावीत, तसेच या किल्ल्यात असलेल्या हौदात म्युझिकल फाउंटन लावण्यात यावा, असेही सांगण्यात आले आहे.

घोडबंदर किल्ल्याजवळ खाली डोंगरकडा आहे. नैसर्गिक पद्धतीने हा कडा कापून ॲम्पी थिएटरप्रमाणे त्यावर बसण्याची व्यवस्था करावी, ती करीत असताना येथे काळे दगड लावण्यात यावीत. याठिकाणी १००-१५० पर्यटक बसू शकतील, अशी व्यवस्था व्हायला हवी. या नैसर्गिक उतारावर बसण्याची सोय केल्यास येथे बसून पर्यटक म्युझिकल फाउंटन, लॅण्डस्केपिंग केलेले गार्डन, किल्ला पाहू शकतील, असे सरनाईक म्हणाले.

# ठाणे परिसरातील सरकारी इमारती धोकादायक

**ठाणे -** रोज शेकडो नागरिकांची रीघ असलेले शिधावाटप कार्यालय आणि जवळच असलेली ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची इमारत धोकादायक झाल्याने त्यामध्ये जीव मुठीत घेऊन काम करण्याची वेळ कर्मचाऱ्यांवर येऊन ठेपली आहे. विशेष म्हणजे नागरिकांनाही या धोकादायक इमारतींमध्ये येऊन कामे करावी लागत असल्याचे समोर आले आहे. या इमारतींच्या पुनर्वसनाची आवश्यकता असल्याने येथील कर्मचारी हवालदिल झाले आहेत.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात ठाणे शहर कार्यक्षेत्र असलेले शिधावाटप विभागाचे आणि ग्रामीण भागाचे कार्यालय आहेत. त्या शेजारीच जिल्हा परिषदेची ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची इमारत आहे. शहरी भागातील कार्यालयात ठाणे शहरातील दोन लाख ११ हजार ६८ शिधापत्रिकाधारक असून ग्रामीण भागातील कार्यालयात एक लाख ७४ हजार ७२८ शिधापत्रिकाधारक आहेत. या कार्यालयांमध्ये दररोज शेकडो सर्वसामान्य नागरिक संबंधित कामांसाठी ये-जा करत असतात. या कार्यालयाची पडझड झाली आहे. नागरिकांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या डोक्यावर नेहमी टांगती तलवार असते. पावसाळ्यात येथे पाणी साचते, तर छतातून पाणीगळतीमुळे कागदपत्रे भिजून मोठे नुकसान होत असते. गेली अनेक वर्षे ही समस्या भेडसावत असल्याच्या तक्रारी नागरिक करत आहेत. शिधावाटप कार्यालयाशेजारी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची इमारत आहे. ती धोकादायक झाली आहे. या कार्यालयात १००च्या आसपास अधिकारी-कर्मचाऱ्यांचा वावर असतो. येथील कर्मचाऱ्यांनी या संदर्भात वारंवार तक्रारी देऊनही त्यांची दखल घेतली जात नव्हती. शुक्रवारी ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी या कार्यालयांची पाहणी केली.

# पालघर जिल्ह्यत पोलीसबळ अपुरे

## अतिरिक्त कामाचा ताण; दोन महिन्यांत तीन पोलिसांचा मृत्यू

**वसई :** पालघर जिल्ह्याच्या पोलीस दलात गेल्या दोन महिन्यांत पाच पोलिसांना हृदयविकाराचा झटका आला असून त्यात तीन पोलीस दगावले. तरुण पोलिसांचा अचानक मृत्यू झाल्याने सारे पोलीस दल हादरले आहे. कमी मनुष्यबळ आणि कामाचा अतिरिक्त ताण यामुळे पोलिसांच्या प्रकृतीवरच परिणाम होऊ लागला आहे. पालघर जिल्ह्यत ५० टक्के पोलीस बळ कमी असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

पालघर जिल्ह्यची निर्मिती झाल्यानंतर २३ पोलीस ठाणी तयार करण्यात आली. २०१४मध्ये जे मनुष्यबळ होते, तेवढचे मनुष्यबळ पोलीस दलात आजही आहे. मागील सहा वर्षांत त्यात वाढ झालेली नाही. सध्या पालघर जिल्ह्यत एक पोलीस अधीक्षक, दोन अतिरिक्त पोलीस अधीक्षक, नऊ उपविभागीय पोलीस अधिकारी (उपअधीक्षक), २६ पोलीस निरीक्षक, ५३ साहाय्यक पोलीस निरीक्षक, १४० पोलीस उपनिरीक्षक आणि २ हजार ८५९ पोलीस कर्मचारी असल्याची नोंद आहे. या पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये साहाय्यक पोलीस



उपनिरीक्षक आणि पोलीस हवालदार यांचा समावेश आहे. मात्र वरील पदे ही केवळ कागदोपत्री मंजूर असून प्रत्यक्षात आठ उपअधीक्षक, २६ पोलीस निरीक्षक, ४४ साहाय्यक पोलीस निरीक्षक, १११ पोलीस उपनिरीक्षक, २ हजार ७०६ पोलीस कर्मचारी असल्याची बाब उघडकीस आली आहे. पालघर जिल्हा हा आदिवासी जिल्हा असला तरी वसई-विरार हा शहरी भाग आहे. वसई-विरारमध्ये सात पोलीस ठाणी असून प्रत्येक पोलीस ठाण्यात केवळ दीडशे ते दोनशे अधिकारी-कर्चमारी आहेत. किती पोलीस बळ हवे यासाठी गृहखात्यामार्फत अभ्यास गट नेमण्यात आला होता. त्यांनी अहवाल शासनाला सादर केला आहे. एक लाख लोकसंख्येमागे किती पोलीस हवे त्याचे प्रमाण या अहवालात देण्यात आले आहे. जिल्हा विभाजन झाल्यानंतर अनेक पोलीस ठाणे शहर, ठाणे ग्रामीण तसेच इतर शाखांमध्ये विलिन झाले. तसेच अनेक पोलिसांची जिल्हा बदली झाली. मात्र त्यांच्या रिक्त जागा भरल्या गेल्या नाहीत. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार केवळ वसई-विरारमध्येच किमान पाच हजार पोलिसांची आवश्यकता आहे. जिल्ह्यतील पोलीस बळ हे ५० टक्कय़ांनी कमी असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. मागील दोन महिन्यांपासून पालघर पोलीस दलातील एकामागोमाग एक पोलिसांना हृदयविकाराचा झटके येऊ लागले आहे. या दोन महिन्यांत एकूण पाच पोलिसांना हृदयविकाराचा झटका आला. त्यात महामार्ग सुरक्षा पोलीस खात्यातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ज्ञानदेव सूर्यवंशी, तलासरीमधील हेड कॉन्स्टेबल गावित तसेच सफाळा पोलीस ठाण्याचे प्रभारी साहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप सानप या तीन पोलिसांचा मृत्यू झाला. तर तुळींज पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक वाल्मिक अहिरे आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुरेंद्र शिंदे यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# बंदीनंतरही होतेय प्लास्टिक उत्पादन

**ठाणे -** प्लास्टिक बंदीनंतरही भिवंडीतून प्लास्टिकचे उत्पादन होत असल्याचा प्रकार भिवंडी पोलिसांनी उघड केला आहे. अंजूर फाट्यावर प्लास्टिकने भरलेला टेम्पो नारपोली पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी निरीक्षक विजय शिरसाट यांनी पकडला. त्यानंतर त्याची खबर भिवंडी महापालिकेला दिल्यानंतर आयुक्त डॉ. प्रवीण आष्टिकर यांच्या आदेशाने अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून ९९० किलो प्लास्टिकच्या पिशव्या जप्त केल्या.



प्लास्टिकबंदीला दीड वर्षाहून अधिक काळ उलटल्यानंतरही अद्याप उत्पादन थांबलेले नसून भिवंडीतून त्याची वाहतूकही होत असल्याचे समोर आले आहे. गुरुवारी नारपोली पोलिस ठाण्याचा आंजूर फाटा परिसरात बंदोबस्त असताना प्लास्टिकच्या पिशव्यांनी भरलेला ट्रक तेथे पोलिसांनी अडवला. त्याची माहिती महापालिकेच्या प्लास्टिक निर्मुलन पथकास देण्यात आली. या पथकाने घटनास्थळी पाहणी केल्यानंतर त्यामध्ये ९९० किलो वजनाच्या प्लास्टिक पिशव्या आढळून आल्या. या प्रकरणी आयुक्तांच्या आदेशाने हे प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी नारपोली पोलिस ठाण्याच वरिष्ठ पोलिस निरिक्षक मालोजी शिंदे उपस्थित होते. याप्रकरणी प्लास्टिक मालकावर दंडात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती भिवंडी महापालिकेकडून कळवण्यात आली आहे.

# पोर्तुगाल राजदूत - राज्यपाल भेट



पोर्तुगालचे भारतातील राजदूत कालीस परेरा मार्किस यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी पोर्तुगालचे मुंबईतील मानद वाणिज्यदूत सोमेश बत्रा देखील उपस्थित होते.

# मीरा भाईंदर न्यायालयाचे काम निधीअभावी रखडले

**मीरा रोड : मीरा भाईंदर शहरासाठी स्वतंत्र न्यायालयाची मागणी गेली अनेक वर्ष होत असली तरी, शासनाने आवश्यक निधीची तरतूदच न केल्याने न्यायालयासह न्यायाधिशांच्या निवासी इमारतीची कामे रखडली आहेत. त्यामुळे न्यायालयाचे कामकाज कधी सुरु होणार, असा प्रश्न नागरिकांसह प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना पडला आहे.**



मीरा भाईंदर शहरात ६ पोलीस ठाणी, २ उपअधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण पोलीसांची वाहतूक शाखा, अनैतिक मानवी वाहतूक शाखा तसेच स्थानिक गुन्हे शाखा आहे. महापालिकेच्या कामकाजाचा व्याप मोठा असून, अपर तहसिलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी कार्यालयही आहेत. विविध पोलीस ठाणी व कार्यालयांच्या अनुषंगाने दाखल होणारे गुन्हे व दावे यासाठी थेट ठाणे येथील न्यायालयात जावे लागते. पोलीस, पालिका, महसूल आदींच्या दाव्यांप्रमाणेच असंख्य खाजगी दाव्यांसाठी नागरिकांनासुध्दा ठाण्याच्या न्यायालयाशिवाय पर्याय नाही. ठाणे न्यायालयात सर्वात जास्त दावे हे मीरा भाईंदरचे असूनही न्यायालयाच्या कामासाठी मात्र ठाण्याला खेपा माराव्या लागत असल्याने नागरिकांसह प्रशासनाचा वेळ आणि पैसा नाहक वाया जातो. नागरिकांना तर कामाचा खाडा करुन न्यायालयाच्या पायराया झिजवाव्या लागतात. त्यातही एका तारखेला काम होत नसल्याने वर्षानुवर्षे चकरा सुरुच असतात.

मीरा भाईंदरसाठी स्वतंत्र दिवाणी आणि फौजदारी न्यायालय व्हावे अशी अनेक वर्षांपासूनची मागणी होती. मीरा भाईंदरमधील वकिलांनीदेखील यासाठी आपली ताकद लावली असताना, ठाण्यातील वकीलांचा मात्र न्यायालय स्थलांतरीत करण्यास विरोध होता. परंतु २०१३ साली मीरा भाईंदरमध्ये न्यायालय बांधकामास तत्कालिन काँग्रेस आघाडी सरकारने मान्यता दिली. न्यायालयाची ३ मजली इमारत, ज्यात ६ न्यायदालन कक्ष व न्यायाधिशांच्या ६ निवासस्थानासाठी तीन मजली स्वतंत्र इमारत अशी मंजुरी होती. परंतु महापालिकेने न्यायाधिशांच्या निवसी इमारतीसाठी केवळ दोन मजल्याचीच परवानगी दिल्याने आता ४ न्यायाधिशांसाठीच निवस्थान होणार आहे. भाजप युती शासनाच्या काळात फडणवीस सरकारने या दोन्ही इमारतींच्या कामांसाठी पुरेशी आर्थिक तरतुदच न केल्याने कामे रखडली. न्यायाधिशांच्या निवासस्थानाच्या इमारतीचे काम २०१७ पासून बंद असून केवळ तळमजल्याचे आरसीसी व पहिल्या मजल्याच्या स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. मुख्य न्यायालय इमारतीचे स्टील्ट अधिक ३ मजल्याचे बांधकाम पूर्ण झाले असून सॅनीटरी, प्लंबींगचे काम काही प्रमाणात बाकी आहे. अंतर्गत रंगकामाचा एक कोट बाकी आहे.

### ठाण्याला येणे - जाणे ठरते त्रासदायक

न्यायालयाची पायरी चढण्याची पाळी कोणावर येऊ नये या मताचे आपण असलो तरी न्यायालयीन कामकाजासाठी शहरातील नागरिकांना स्वतंत्र दिवाणी व फौजदारी न्यायालयाची गरज आहे. ठाणे येथे न्यायालयात ये - जा करणे नागरिकांसह पोलीस, पालिका आदींना त्रासदायक बनले आहे. फडणवीस सरकारच्या काळात मीरा भाईंदर न्यायालयासाठी निधीची तरतुद न केली गेल्याने न्यायालयाचे काम रखडले असल्याची टीका केली जात आहे. हे काम ठाकरे सरकारच्या काळात पूर्ण केले जाईल असे सेना आ. प्रताप सरनाईक यांनी सांगितले. निधीअभावी न्यायालयाचे काम रखडल्याने नागरिकांना ठाण्याला खेपा माराव्या लागतात याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला.

# पुण्यातील प्रसिद्ध 'येवले चहा'मध्ये भेसळ असल्याचे सिद्ध
# FDAच्या अहवालातून उघड

**पुणे : अल्पावधीतच लोकप्रिय झालेल्या पुण्यातील प्रसिद्ध 'येवले चहा'मध्ये भेसळ असल्याचे सिद्ध झाले आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अहवालात हे उघड झाले आहे. चहामध्ये रंग टाकत असल्याची माहिती समोर आली आहे. फूड सेफ्टी आणि स्टँडर्ड ऑथॉरिटी ऑफ इंडीयाच्या (FSSAI) गाईडलाईननुसार रंगाचा वापर करणे चुकीचे आहे.**




येवले चहाचे कोंढव्यातील उत्पादन केंद्र बंद ठेवण्याचे आदेश काही महिन्यांपूर्वी अन्न आणि औषध प्रशासनाचे (एफडीए) सह आयुक्त एस. एस. देशमुख यांनी दिले होते. येवले चहा प्यायल्याने पित्त होत नाही. तसेच, चहासाठी मिनरल वॉटर वापरले जात असल्याचा चुकीचा दावा त्यांना भोवला असून, कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी, पॅकबंद मालावर कोणती माहिती नसणे अशा विविध नियमांचे उल्लंघन केल्याने पुढील आदेश येईपर्यंत उत्पादन केंद्र बंद ठेवण्याचा आदेश दिला होता.

येवले चहामधे मेलामाईनचा वापर केला जात असल्याचे वृत्त पसरले होते. त्या पार्श्वभूमीवर एफडीएने कोंढव्यातील येवले फूड प्रॉडक्ट येथे तपासणी केली. चहा पावडर, साखर, चहा मसाला यांचे नमुने आणि सहा लाख रुपयांचा साठा संशयावरुन जप्त केला. तसेच, अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. यावर येवले अमृततुल्यचे संचालक नवनाथ येवले यांनी एका व्हिडीओद्वारे आपली भूमिका मांडली होती.

'येवले अमृततुल्य'कडून मेलामाईन नावाचा पदार्थ वापरण्याचं कुठलंही कृत्य केलं जात नाही. एफडीएच्या अधिकाऱ्यांना पॅकिंगसदर्भात काही त्रुटी आढळून आल्या होत्या, त्याची पूर्तता आम्ही केली आहे. प्रसारमाध्यमांमध्ये व्हायरल झालेल्या बातम्यामधील मजकूरप्रमाणे मेलामाईन नावाचा पदार्थ आढळून आला नाही, आम्ही तो वापरतही नाही. ग्राहकांच्या जीवाशी खेळायचा अधिकार आम्हाला नाही, आमच्यावर तसे संस्कारही झालेले नाहीत. त्यामुळे ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, आमच्या सर्व फ्रँचाईजी नेहमीप्रमाणे सुरूच राहतील, असं नवनाथ येवले यांनी म्हटलं होतं.

# २५० भारतीय विद्यार्थी अडकले मृत्यूच्या दाढेत
## चीनमधील 'कोरोना व्हायरस'च्या शहरातून बाहेर पडता येईना

चीनमध्ये धुमाकूळ घातलेल्या आणि आतापर्यंत ५६ जणांचा बळी घेतलेल्या कोरोना व्हायरसमुळे भारताची चिंता वाढली आहे. कोरोना व्हायरसचं जिथं केंद्र मानलं जातंय त्या शहरात २५० भारतीय विद्यार्थी अडकले आहेत. मृत्यूच्या या दाढेतून त्यांची सुटका करावी, यासाठी आता भारत सरकारने चीन सरकारकडे विनंती केली आहे.

कोरोना व्हायरसचा जिथे सर्वाधिक प्रभाव आहे, अशा १७ शहरांमध्ये येण्या-जाण्यासाठी बंदी घातली आहे. या शहरांशी कोणीही संपर्क करू नये यासाठी त्या शहरांवर बंदी घालण्यात आली आहे. यातील वुहान नावाच्या शहरात ७०० भारतीय विद्यार्थी शिकतात. हेच शहर कोरोना व्हायरसचे केंद्रबिंदू आहे. या शहरात आतापर्यंत ४६ जणांचा कोरोना व्हायरसमुळे जीव गेला आहे. ७०० विद्यार्थ्यांपैकी अनेक विद्यार्थी सुटीमुळे भारतात आले. मात्र तेथे अद्याप २५० विद्यार्थी अडकलेले आहेत. या भारतीय विद्यार्थ्यांची सुटका करावी आणि त्यांना भारतात परत येऊ द्यावे, अशी मागणी भारताने चीनच्या परराष्ट्र खात्याकडे केली आहे.



कुटुंबीयांना काळजी, आमच्या मुलांचं काय होणार?

वुहान शहरात अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आता आपल्या मुलांबाबत चिंता वाटू लागली आहे. कारण संपूर्ण चीनमध्ये आणि खासकरून वुहान शहरात कोरोना व्हायरस वेगाने पसरू लागला आहे. वुहान विद्यापिठात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याच्या पालकाने सांगितले की, 'तेथे अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांकडील खाण्या-पिण्याचे साहित्य संपत आले आहे. तेथील वाहतूक बंद आहे. तेथील दुकानं बंद आहेत. विद्यार्थ्यांना बाहेर पडण्यासही बंदी घालण्यात आली आहे. जेव्हा विद्यार्थी बाहेर पडण्याच्या तयारीत होते, तेव्हाच तेथे बंदी घालण्यात आली.'

# देशाच्या महसुली तुटीत होणार वाढ; आर्थिक चिंतेत आणखी भर पडणार

**मुंबई : केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर होण्यापूर्वी मोदी सरकारसाठी आणखी एक चिंतेची बातमी आली आहे. चालू वित्त वर्षात (२०१९-२०) भारताची महसुली तूट वाढण्याची प्रबळ शक्यता बँक ऑफ अमेरिका सिक्युरिटीजने व्यक्त केली आहे. महसुली तूट सकळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) ३.८ टक्क्यांपर्यत जाऊ शकते, असे बँकेच्या अहवालात म्हटले आहे.**

५ जुलै २०१९ रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्प मांडला तेव्हा महसुली तूट ३.३ टक्क्यांवर ठेवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला होता. सीतारामन पुढील शनिवारी (१ फेब्रुवारी) २०२०-२१ साठीचा अर्थसंकल्प सादर करतील. त्यावेळी अर्थमंत्री महसुली तूट ३.५ राहील, अशी घोषणा करू शकतात, असे बँक ऑफ अमेरिका सिक्युरिटीजने आपल्या अहवालात म्हटले आहे.

प्राप्तिकरात कपात तसेच लघु आणि मध्यम उद्योगांना सवलतीच्या दरात



कर्ज देण्याची घोषणा अर्थमंत्र्यांकडून केली जाऊ शकते, असेही हा अहवाल म्हणतो. याशिवाय घर खरेदीला चालना देण्यासाठी विशेष योजनेची घोषणा केली जाऊ शकते.

### २० वर्षात प्रथमच थेट संकलन घटणार

केंद्र सरकारला मिळणारा कॉर्पोरेट कर आणि प्राप्तिकर वीस वर्षांत यंदा प्रथमच घटण्याची शक्यता आहे. जगातील अग्रग्रण्य वृत्तसंस्था असलेल्या रॉयटर्सने काही वरिष्ठ कर अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या आकडेवारीच्या आधारे याबद्दलचे वृत्त दिले आहे. वृद्धीदरात घसरण झाल्याने सरकारने कॉर्पोरेट करात कपात केली. त्याचा परिणाम आता कर संकलनावर होताना दिसत आहे.

मार्चमध्ये संपणाऱ्या आर्थिक वर्षात थेट कराच्या माध्यमातून १३.५ लाख कोटी रुपयांचे उत्पन्न मिळेल, अशी आशा सरकारला होती. गेल्या वित्त वर्षाच्या तुलनेत यंदा थेट कराच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नात १७ टक्क्यांची वाढ सरकारला अपेक्षित होती. मात्र गेल्या वर्षभरापासून अर्थव्यवस्था मंदीसदृश परिस्थितीतून जात असल्यामुळे मागणी घटली आहे. याचा थेट परिणाम गुंतवणूक आणि नोकऱ्यांवर झाला आहे. यामुळे कर संकलनात घट झाली आहे.

### महसुली तूट वाढणार, म्हणजे नेमके काय होणार?

**उत्पन्न कमी आणि खर्च जास्त असा महसुली तुटीचा सोपा अर्थ होतो. खर्च जास्त असल्यास गरजा पूर्ण करण्यासाठी आपण कर्ज घेतो. सरकारदेखील हेच करते. महसूल कमी असल्यास सरकारला जागतिक बँकेसारख्या संस्थांकडून कर्ज घ्यावे लागते. या कर्जावर सरकारला व्याजही द्यावे लागते.**

# हिंसा नको: शांततेने तोडगा निघू शकतो
## 'मन की बात' मध्ये PM मोदींचं आवाहन

**नवी दिल्ली** – हिंसा केल्याने कोणत्याही समस्याचे निराकरण होऊ शकत नाही. कोणत्याही कारणांशिवाय शस्त्र हाती घेणाऱ्या लोकांसोबत चर्चा करून शांततेने तोडगा काढला जाऊ शकतो, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजच्या 'मन की बात'या कार्यक्रमातून दिला.

'परीक्षा पे चर्चा' द्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा विद्यार्थ्यांना डोळ्यासमोर ठेऊन 'मन की बात' केली. विद्यार्थ्यांनो लवकरच परीक्षा सुरू होणार आहेत. देशाच्या तरुणांचा आत्मविश्वास वाढला आहे. एकीकडे परीक्षा सुरू होणार आहेत तर दुसरीकडे थंडी पसरलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यायाम करावा असा मोलाचा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना दिला. सध्या फिट इंडियासाठी खूप प्रयत्न होताना दिसत आहेत. फिट इंडिया स्कूल मोहिमेला जबरदस्त पाठिंबा मिळाला आहे. ६५ हजार शाळांनी अर्ज करून प्रमाणपत्र मिळवल्याची माहितीही मोदी यांनी आज मन की बात कार्यक्रमातून देशवासियांना दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी



आज मन की बात या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच देशवासियांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या वर्षीच्या पहिला कार्यक्रम आहे, असे सांगून मोदी म्हणाले की, प्रजासत्ताक दिनामुळे आपल्याला मन की बात कार्यक्रमाची वेळ बदलावी लागली. दिवस बदलतात. वेळ बदलते, वर्ष बदलते, परंतु, भारतीय लोकांचा उत्साह दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या वर्षी आम्ही अनेक संकल्प केले. सिंगल यूज प्लास्टिक, मुली शिकवा, मुली वाचवा अभियान राबवले. जल संरक्षणासाठी देशभरात प्रयत्न सुरू आहेत. यात प्रत्येक समाजातील व्यक्तींनी योगदान दिले. उत्तराखंडच्या इल्मोडा मध्ये एक किलोमीटर पर्यंत पाइप लाइन टाकून दोन दशकापूर्वीची समस्या मिटवण्यात आली. देशभरात अशा असंख्य कथा आहेत. जल संरक्षण केले जाणारे कार्य शेअर करा, असे आवाहन मोदी यांनी केले.

पृष्ठ १ वरुन

# ठाणे जिल्ह्यात शिवभोजन योजनेचा शुभारंभ

आणि लक्ष्मी कँटरर्स लोकमान्य नगर येथे शिवभोजन योजनेचा शुभारंभ पालकमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

राज्य शासनाने जाहीर केलेल्या शिवभोजन योजनेअंतर्गत राज्यात स्वस्त दरात शासकीय अनुदान प्राप्त भोजनालयातून भोजन उपलब्ध करून देण्याची योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत सुरू करण्यात येणाऱ्या भोजनालयात दोन चपात्या, एक वाटी भाजी, एक वाटी वरण, भात समाविष्ट असलेली जेवणाची थाळी दहा रुपये प्रति थाळी याप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येईल. भोजनालय चालवण्यासाठी सद्यस्थितीत सुरु असणाऱ्या खानावळ, एनजीओ, महिला बचत गट, भोजनालय, रेस्टोरेंट अथवा मेस यापैकी सदर योजना राबविण्यास सक्षम असलेल्या भोजनालयाची निवड करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यात सात ठिकाणी शिवभोजन केंद्राचा प्रारंभ झाला आहे. गरीब, गरजू जनतेला सवलतीच्या दरात फक्त १० रुपयात भोजन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री श्री. शिंदे यांनी केले .

शिवभोजन या योजनेसाठी मोबाईल ॲपची निर्मिती करण्यात आली असून शिवभोजन करणाऱ्या व्यक्तीचे छायाचित्र या ॲपव्दारे काढण्यात येईल यामुळे या योजनेत पारदर्शकता येणार आहे.

राज्य शासन या योजनेसाठी प्रत्येक जेवणाच्या ताटा मागे अर्थात प्रत्येक थाळीसाठी शहरी भागामध्ये रुपये ५० तर ग्रामीण भागामध्ये रुपये ३५ असे दर कंत्राटदारांना देणार आहे. त्यामुळे प्रत्येक ग्राहकांकडून केवळ १० रुपये रक्कम घेतली जात असली तरी सदर थाळीची किंमत ही शहरी भागांमध्ये ५० रुपये व ग्रामीण भागामध्ये ३५ रुपये असणार आहे. दहा रुपये वगळता अन्य रक्कम ही अनुदान असणार आहे. त्यामुळे या थाळीचा वापर गरजू गरीब नागरिकांसाठी व्हावा अशी अपेक्षा पालकमंत्री श्री.



शिंदे यांनी व्यक्त केली. जेवण दुपारी बारा ते दोन या कालावधीतच या भोजनालयातून शिव भोजन थाळी मिळणार आहे. शिव भोजन थाळी अंतर्गत प्रत्येक संस्थेला अधिकाधिक दीडशे थाळी देणे अनिवार्य आहे. शासकीय कर्मचारी तसेच कोणत्याही आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सदर भोजनालयात सवलतीच्या दराने जेवणास सक्त मनाई असेल. प्रत्येक भोजनालयातील अन्नाचा दर्जा योग्य असल्याबाबत अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी तपासणी केली जाणार आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)